
# छात्र प्रबोधन

सौर अग्रहायण शके १९४५ । वर्ष २४ अंक ३।
(प्रारंभापासूनचा अंक क्रमांक – वर्ष ३२ अंक ५)
वार्षिक वर्गणी ₹ २५०। मूल्य ₹ २५। पृष्ठे २८



ज्ञान प्रबोधिनीचे कुमारांसाठी,
कृतिशीलता जोपासणारे मासिक!

# आज प्रचीती द्या!



गिरिकुहरातिल गर्द बनातिल सिंहाच्या छाव्यांनो,
तिमिरपुरातिल कृष्णघनातिल तेजस्वी ताऱ्यांनो,
प्रलयंकर शक्तीची तुमच्या आज प्रचीती द्या
तुमच्या शुभकर सामर्थ्याची आज प्रचीती द्या ।। ध्रु. ।।

मूक मनांच्या कारागारी धुमसत जी चिनगारी
वीज होउनी कोसळु द्या ती उद्धत अंधारी
त्या भस्मातुन बहरुन येइल हिरवा स्वर्ग उद्या ।। १ ।।

शतकांपूर्वीची जयगीते अजुनि घुमत कानी
शतकांपूर्वी अखिल धरेला क्षेम दिले आम्ही
ते सळसळते पौरुष फिरुनी नसांत वाहू द्या ।। २ ।।

पवित्र मूर्ती प्रिय आईची दुभंग परि झाली
अमित संपदा अतुल वैभवे कुटिलांनी लुटली
गतकालाचे विषाद गौरव भविष्य घडवू द्या ।। ३ ।।

सर्व दिशांनी विकसित होवो व्यक्तिमात्र येथे
सर्वार्थांनी रत्नवंत हो क्षेत्रक्षेत्र येथे
या भूमीला सृजनांची नभपंखी स्वप्ने द्या ।। ४ ।।

समर्पणाची हाक जयांच्या हृदयाला कळली
अजिंक्य झाले राष्ट्र तयांचे अभेद्य बलशाली
सार्थकतेच्या परिसाने त्या जीवन उजळू द्या ।। ५ ।।

**- वाच. स्वर्णलता भिशीकर**

या पद्याची चाल ऐका
आणि पद्य म्हणा...

**पद्याचा अर्थ :** सदर पद्यातून 'आपल्या मातृभूमीचे गतवैभव मिळवून देण्यासाठी स्वत:मधील सकारात्मक शक्तीचे सामर्थ्य जगाला दाखवून द्या', असे कुमार युवक-युवतींना आवाहन केले आहे. अशा कुमार युवक-युवतींना कवयित्री निडर अशा सिंहाच्या छाव्याची उपमा देतात. हे युवक-युवती अंधारात प्रकाश दाखवणारे जणू तेजस्वी तारे आहेत. कवयित्री त्यांना उद्‌देशून म्हणतात, 'ठिणगीच्या स्वरूपात असलेली, तुमच्या मनात दबलेली सुप्त अस्मिता जागी करण्याची वेळ आज आली आहे. जिथे-जिथे अनिष्ट रूढी, परंपरा, दहशतवादाचा अंधकार माजला आहे तिथे-तिथे कधी आत्मशक्तीच्या तर कधी आत्मसमर्पणाच्या जोरावर प्रहार करण्याची वेळ आज आली आहे. शतकांपूर्वी ही मातृभूमी सुजलाम-सुफलाम होती. तिच्या यशाची, गौरवाची गीते आजही आसमंतात भरून आहेत. काळाच्या ओघात अनेकांच्या आक्रमणांमुळे तिचे वैभव लयास गेले आहे. तिचे गतवैभव तिला प्राप्त करून देणे, हे प्रत्येकाचे आद्य कर्तव्य आहे. त्यासाठी तुमच्यातील सामर्थ्याला विधायक कृतीची जोड द्या. आकाशाला गवसणी घालणारी भव्य स्वप्ने तुम्ही पाहा. प्रत्येक क्षेत्रात नवे नवे प्रयोग, संशोधन करून स्वत:बरोबर देशाला समृद्ध करा. त्यागाच्या सामर्थ्यावर राष्ट्र उभे राहते. ज्या-ज्या वेळी राष्ट्रासाठी त्याग केला गेला ते-ते राष्ट्र बलशाली झाले. त्यांच्यावर कुणी आक्रमण करू शकले नाही, असा इतिहास सांगतो. राष्ट्राला बलशाली करण्यासाठी पुनश्च एकदा भौतिक सुखाचा त्याग करण्याची वेळ आली आहे. 'कशासाठी जगावे' आणि 'कसे जगावे' हे कळले की तुमच्या जीवनाचे सार्थक होईल,' असा विश्वास कवयित्री व्यक्त करते.

छात्र प्रबोधन निव्वळ मासिक नव्हे!
ज्ञान प्रबोधिनीद्वारा विद्यार्थ्यांच्या
सर्वांगीण विकसनाची चळवळ!!
मासिक। दिवाळी अंक। प्रकाशने।
कल्पक स्पर्धा। साहित्य मेळावे-संमेलने।
कार्यशाळा। अभियाने, अन्य उपक्रम।

ॐ
इवली शल्ये रुपती खुपती
मात करू दे त्यांच्यावरती
प्रगल्भतेचे पंख देऊनी
ने ज्योतिर्जगतात


# छात्र प्रबोधन

सौर अग्रहायण, शके १९४५। वर्ष २४ अंक ३
(मासिकाचा प्रारंभ : सौर श्रावण शके १९१४/ऑगस्ट १९९२
एकूणात ३७७ वा अंक, वर्ष ३२ अंक ५)
प्रकाशन दिनांक - सौर १० अग्रहायण, शके १९४५/१ डिसेंबर २०२३


## अंतरंग


२. पद्य... **आज प्रचीती द्या!*** - वाच. स्वर्णलता भिशीकर

४. **संवाद** - शिल्पा कुलकर्णी

५. कथा... **माझा भाऊ आहे तो!*** - संगीता पुराणिक

१०. माहितीपर... **शेतीतले रोबॉटस्!*** - डॉ. मेघश्री दळवी

१३. ललित... **चिमणी आक्का!** - आसावरी देशपांडे-जोशी

१५. विज्ञान प्रयोग... **टूथपेस्टचा असाही वापर!*** - डॉ. कांचनगंगा गंधे

१६. कविता... **कानमंत्र*** - डॉ. सुमन नवलकर

१७. लेखमाला... **गप्पा आपल्या देशाच्या! - १२**
**मतं आणि तथ्य यांचे सत्य!** - नचिकेत नित्सुरे

२०. कथा.. **किल्ल्यातील रहस्य** (भाग १) - सुधांशु नाईक

२३. माहितीपर... **गोंडकला*** - अपर्णा म्हात्रे

२४. **निवडक बालकुमार दिवाळी अंक २०२३ - परिचय**

२७. **दिवाळी अंक प्रतिक्रिया**

**याशिवाय :** हसा हसा... (९), ओळखा पाहू, छात्र प्रबोधन दिनदर्शिका आवाहन (१२), सोडवा ही काव्यकोडी (२२), वर्गोद्दिष्ट स्पर्धा*, प्रतिसादी वाचकवीर (२६), घरपोच दिवाळी अंक मिळण्यासाठी निवेदन* (२७)






**पानांखालील ओळी - काव्यपंक्ती :** थंडीविषयी...
**माहितीपर :** विविध राज्यांमधील मोठी धरणे

**अवश्य वाचा... पाहा... ऐका...** * **या लेखांना QR कोड दिले आहेत ते स्मार्टफोनवर स्कॅन करा.** त्यासाठी गुगल प्ले स्टोअरवरून QR code scanner मोफत डाऊनलोड करा.

**छात्र प्रबोधन युट्यूब चॅनेल लिंक - सभासद व्हा!**
https://youtube.com/@user-rk8py6zj7f


संपर्क पत्ता : छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे 411030
☎ (०२०) २४२०७१७४/१७५ संकेतस्थळ : www.chhatraprabodhan.org
इ-मेल : chhatraprabodhan@jnanaprabodhini.org



या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदानापोटी काही रक्कम प्राप्त झाली आहे. परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास मान्य असतीलच असे नाही.



**संपादक, प्रकाशक, मुद्रक**
महेन्द्र सेठिया

**मानद संपादक**
शैलजा देशमुख

**संपादक मंडळ**
वाच. कांचनगंगा गंधे,
आश्लेषा महाजन,
स्वाती ताडफळे,
मल्हार अरणकल्ले

**कार्यकारी संपादक**
शिल्पा कुलकर्णी

**साहाय्यक कार्यकारी संपादक**
वैशाली दीक्षित

**मुखपृष्ठ**
दत्तात्रय पाडेकर

**आतील चित्रे**
सायली कुलकर्णी


**छात्र प्रबोधन मासिकाची वर्गणी**
वार्षिक : ₹ २५०,
द्वैवार्षिक : ₹ ५००,
त्रैवार्षिक : ₹ ७००,
दशवार्षिक : ₹ २२००

घरपोच दिवाळी अंकासाठी
प्रतिवर्षी ₹ ५० जादा

**या अंकाची किंमत : ₹ २५/-**


**पुस्तकांच्या ऑनलाइन खरेदीसाठी व मासिकाच्या ऑनलाइन सभासद नोंदणीसाठी**
**jpprakashane.org**
या संकेतस्थळाला भेट द्या!!


धुक्याची पांघरुन शाल, आला हिवाळा हिवाळा। गप्पांचा फड रंगला, पेटल्या शेकोटीच्या ज्वाळा।।

वार्षिक देणगीदार -
- श्री. निखील आपटे, पुणे
- मे. बडवे इंजिनियर्स प्रा. लि., पुणे
- श्री. तन्मय बुडूख, पुणे
- असेंट हॉस्पिटॅलिटी प्रा. लि., पुणे
- श्री. शशांक चांदोरकर, पुणे
- श्री. अजित दातार, पुणे

## संवाद

**प्रिय प्रबोधकांनो,**

कशी गेली दिवाळीची सुट्टी? सुट्टीत 'छात्र प्रबोधन'चा दिवाळी अंक वाचून झाला का? कसा वाटला अंक? काय आवडलं, अंकात अजून काय असायला हवं होतं? अशा प्रकारच्या तुमच्या प्रतिक्रिया आमच्यापर्यंत नक्की पोहोचवा. तुम्हाला आवडलेल्या लेखांच्या किमान २/३ लेखकांना तरी आवर्जून पत्र/मेल पाठवा.

आणि हो, दिवाळी अंकाच्या शेवटी दिलेली कल्पक भेट - **बहुउपयोगी संकल्प फलक** तयार केला का? खूप विचारपूर्वक अशी ती भेट तुम्हाला करायला सुचविली आहे बरं...! **'माझे संकल्प-माझा विकास'** असं त्या संकल्प फलकाचे शीर्षक आहे! **'आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास दुसरा-तिसरा कोणी करणार नसून, स्वत:लाच करायचा आहे,'** अशी त्या संकल्प फलकामागील कल्पना आहे. त्यासाठी संकल्प फलकात दिलेल्या सहा संकल्पांपासून तुम्ही सुरुवात करा पाहू...

वेगवेगळ्या प्रकारचे अनुभव घेतल्यामुळे आपल्या व्यक्तिमत्त्वाला धुमारे फुटतील. नवीन गोष्टी करून बघण्याचा आपला उत्साह वाढेल. त्यातून 'सातत्याने, योग्य दिशेने प्रयत्न केल्यास, एखादी गोष्ट साध्य होऊ शकते,' याची जाणीव तुम्हाला होऊ लागेल. ती गोष्ट मिळवण्यासाठी, आत्मसात करण्यासाठी तुमची धडपड सुरू होईल. यांमुळे तुमच्यातले सुप्त गुण जागृत होतील. तुमच्यातल्या सुप्त गुणांना खतपाणी घालून तुम्ही त्यांची जोपासना कराल, त्यांना फुलवाल. कालांतराने आत्मविश्वास वाढीस लागून तुमच्या व्यक्तित्त्वाला झळाळी प्राप्त होईल आणि तुमचे व्यक्तिमत्त्व चारचौघात वेगळे, उठून दिसेल.



असे आपले व्यक्तिमत्त्व 'प्रभावी' होण्यासाठी आधी शरीर सुदृढ, सतेज असायला हवं! त्यासाठी **व्यायामाचा** संकल्प हवाच! रोज किमान २० मिनिटे व्यायाम करण्यापासून सुरुवात करा (सूर्यनमस्कार, दोरीच्या उड्या, धावणे, पोहोणे, जोर-बैठका इ.पैकी कोणतेही २-३ व्यायाम प्रकार आवर्जून निवडा). आणि आपलं शरीर बळकट करा. वेगवेगळे अनुभव घेण्यासाठी निसर्गाच्या सान्निध्यात **भटकंती** करा. त्यामुळे मन ताजेतवाने होते. आपल्या संवेदना जागृत होतात, तल्लख होतात. मनात सकारात्मक विचार निर्माण होतात. बुद्धिला कल्पकतेची जोड मिळाली की, नावीन्याचा उगम होतो. त्यासाठी **'छंदां'ची जोपासना** उपयोगी पडते. छंदातून आपली आवड उमगत जाते. मात्र, या सगळ्याला **'स्वावलंबना'ची** जोड हवी. स्वत: करून बघण्याचा आनंद काही निराळाच असतो! दैनंदिन कामापासून स्वावलंबी व्हायला सुरुवात करत अभ्यासाची वेगवेगळी तंत्रं वापरून, अभ्यास परिणामकारक होण्यासाठी 'स्वत:' प्रयत्न करा. अशाप्रकारे वेगवेगळ्या क्षेत्रांत कर्तृत्व गाजवायचे असेल, तर थोरा-मोठ्यांची चरित्रे वाचून प्रेरणा मिळते. आपली दृष्टी विकसित होत जाते. त्यामुळे दरमहा **अवांतर वाचन** (अभ्यासाव्यतिरिक्त) करायचेच, हे ठरवून टाका. स्वत:ला जे 'आतून' वाटतंय, ते प्रभावीपणे प्रकट होण्यासाठी; तुम्हाला ज्या माध्यमातून व्यक्त व्हावंसं वाटतंय, त्या माध्यमातून व्यक्त व्हा! प्रभावीपणे व्यक्त होण्यासाठीचं एक व्यासपीठ म्हणजे **स्पर्धा!** शाळेत, विविध संस्थांमध्ये, परिसरात वेगवेगळ्या निमित्ताने योजलेल्या स्पर्धांतील तुमचा सहभाग वाढवा. त्यासाठी नियमित सराव करा आणि आत्मविश्वास मिळवत, आहे त्यापेक्षा दोन पावले पुढे जा!

तुमच्या लक्षात येतंय का, वरील सर्व बाबी आपल्या दिवाळी अंकाच्या 'कल्पक भेटी'तच सामावल्या आहेत. तुम्ही कल्पक भेट 'तयार' केली असेल; आता त्यात सुचवलेल्या संकल्पांची देखील लवकरच निश्चिती करून, ते कृतीत आणायला सुरुवात करा! संकल्पपूर्तीच्या वाटेवर कोणतीही अडचण आली तर आम्हाला केव्हाही हाक मारा! तुमची अडचण सोडवण्यासाठी 'छात्र प्रबोधन' सदैव तुमच्या सोबत असेल!

**विविध कृतिसंकल्पांची पूर्ती करत, तुमचे व्यक्तिमत्त्व चहूबाजूंनी फुलण्यासाठी तुम्हाला खूप शुभेच्छा!**

**तुमची**
**शिल्पाताई**

**जाणून घ्या : हिराकूड (ओडिशा)** - हे महानदी वरील धरण असून जलविद्युत, सिंचन व पूर नियंत्रणात बदल हा उद्देश आहे.

वार्षिक देणगीदार - ➢ श्री. निरामय दाते, अंधेरी, मुंबई ➢ गेझनर इंडिया प्रा. लि., पुणे ➢ चि. अखिलेश संतोष काकडे, पुणे ➢ डॉ. प्रतीक रवींद्र सेठिया, पुणे ➢ श्री. सुदीप सुभेदार, छ. संभाजीनगर - कै. प्रभाकर सुभेदार स्मरणार्थ

माहितीपर

# शेतीतले रोबॉट्स

– डॉ. मेघश्री दळवी

*रोबॉट्स* म्हटलं की, कारखान्यांमध्ये काम करणारे, धातूने बनलेले अवाढव्य आकार डोळ्यांसमोर येतात. नाहीतर चित्रपटांमध्ये *फाइट* करणारे, तुटक बोलणारे, माणसाच्या आकाराचे रंगीबेरंगी *रोबॉट्स* समोर येतात; पण या सगळ्याचा शेतीशी काय संबंध असं तुम्हाला वाटत असेल ना? पण गंमत म्हणजे शेतीत *रोबॉट्सची* आजकाल इतकी मदत व्हायला लागली आहे, की उद्या *रोबॉटला* 'शेतकऱ्याचा मित्र' असं नाव सहज मिळून जाईल!

जरा विचार करून पाहा. शेती म्हटलं की, कित्येक कष्टाची कामं करावी लागतात. पहिल्यांदा शेताची नांगरणी आणि जमिनीची मशागत करून ती सपाट करणं, पेरणी, नित्य नेमाने पाण्याचं सिंचन, आवश्यक असेल तसं खत घालणं, मग पिकाची वाढ व्हायला लागली की, कीड पडू नये याची काळजी घ्यायची, शेतातलं उपद्रवी तण काढून टाकायचं. कोल्हे, हत्ती, माकडं, पक्षी, यांनी पिकाचं नुकसान करू नये, म्हणून डोळ्यांत तेल घालून ते जपायचं अशी अनेक कामं करावी लागतात.

पीक तयार झाल्यावर कापणी, मळणी, उफणणी असे कितीतरी टप्पे पार पाडल्यावर मग धान्य पोत्यात घालून विक्रीला नेलं जातं. तेव्हा या सगळ्या कामांमध्ये मिळेल तितकी मदत कमीच वाटते. आपले शेतकरी सध्या थोड्याफार प्रमाणात *ट्रॅक्टर* किंवा इतर यंत्रांच्या साहाय्याने शेती करतात.

आता तुम्ही लगेच विचाराल की, या सगळ्यात *रोबॉट्स* खरोखरच मदत करू शकतील का? तर या प्रश्नाचं उत्तर आहे 'हो.' पण ही मदत फार वेगळ्या प्रकारची असणार आहे. आपण उदाहरणं घेऊनच बघू या.



शेती म्हटल्यावर सगळ्यात पहिला प्रश्न आहे की, शेतकऱ्याच्या विशिष्ट जमिनीसाठी कोणतं पीक चांगलं ठरेल. वर्षानुवर्षं एक ठरावीक पीक घेण्याची परंपरा असली, तरी आज शेतकरी त्यात प्रयोग करू लागले आहेत. अशावेळी *रोबॉट्स* जमिनीचा कस मोजतील. त्या परिसरात पाणी किती मिळेल, हवामान कसं राहील याची माहिती काढतील. मग तिथे कोणती पिकं घेता येतील, दर एकरी किती उत्पादन होईल आणि त्यातल्या कोणत्या पिकांना सर्वात जास्त बाजारभाव मिळेल याचं विश्लेषण करतील. ही सगळी माहिती घेऊन, *रोबॉट्स* शेतकऱ्याला योग्य सल्ला देतील. आज हे काम करणारी काही '*ॲप्स*' उपलब्ध आहेत; पण प्रत्यक्ष जमिनीचा अभ्यास मात्र शेतकऱ्याला स्वत: करावा लागतो. तिथे कृत्रिम बुद्धिमत्ता असलेले *रोबॉट्स* वापरले, तर अभ्यास अधिक काटेकोर आणि नेमका होऊ शकतो.

नांगरणीसारख्या शारीरिक कष्टाच्या कामात *रोबॉट्स* एकदम प्रवीण असतात. ते कधी दमत नाहीत. दिवसभर काम करून संध्याकाळी थकून

**जाणून घ्या : इडुक्की (केरळ)** – हे पेरियार नदीवरील धरण असून वीज निर्मिती हा या धरणाचा उद्देश आहे.

वार्षिक देणगीदार -
➢ श्री. निश्चल गोऱ्हे, हैद्राबाद ➢ श्री. चिन्मय जोशी, पुणे ➢ श्री. सौमित्र जोशी, पुणे
➢ सौ. जान्हवी जोशी-शहा, पुणे ➢ श्री. आदित्य करंदीकर, पुणे ➢ सौ. आसावरी फडके (बापट), पुणे

बसले असंही कधी होत नाही. कोणत्या पिकाला नांगरणी कशी हवी, बिया पेरताना त्यांच्यामधील जागा किती राखायची अशी माहिती त्यांना देऊन ठेवली, तर पुन्हा पुन्हा सांगायला लागत नाही. त्यांचा कामाचा वेग तर माणसापेक्षा कितीतरी पटींनी जास्त असतो. पाणी सिंचनाचं कामदेखील ते पटापट आणि अचूक करू शकतात. त्यामुळे भली मोठी शेतजमीन असली तरी एकदोघं शेतकरी *रोबॉट्सच्या* मदतीने व्यवस्थित शेती करू शकतात.

पीक वाढत असताना आजूबाजूला कित्येकदा तण वाढत असतं. हे तण नष्ट करण्यासाठी शेतकरी तणनाशकांचा फवारा मारतात; पण त्यातून पिकामध्येही घातक रसायनं जातात. यावर उपाय म्हणजे तण ओळखणारे *रोबॉट्स. रोबॉट्स* शेतकऱ्याने लावलेलं पीक आणि तण यांच्यातला फरक बरोबर ओळखू शकतो आणि ते तण उपटून नष्ट करू शकतो. त्यामुळे रासायनिक तणनाशक वापरणं टाळता येईल. पिकावर पडणाऱ्या किडीसाठीही अशीच कल्पना वापरता येईल.

पीक तरारून आलं की, राखणीचा प्रश्न येतो. तिथेही *रोबॉट्स कॅमेरा* वापरून दूरवरून येणारे प्राणी ओळखू शकतील. टोळधाडीची वर्दी आधी देऊ शकतील. पिकाची नासाडी व्हायच्या आधी *अलार्म* देऊ शकतील. त्यांना आणखी काही उपकरणांची जोड दिली, तर प्राण्यांना पळवून लावू शकतील.

हवामानातल्या अचानक बदलाने आपण पुरते चक्रावून गेलेलो आहोत; पण हवामानाचा अदमास समजला की, तातडीने द्राक्षासारख्या नाजूक वेलींवर आच्छादन घालण्याचं काम करू शकतील. आपल्या शारीरिक आणि बौद्धिक क्षमतेने *रोबॉट्स* ही सगळी कामं एकदम सुकर



करून टाकतील. म्हणजे आपला शेतकरी सुखाने झोप घेऊ शकेल.

पुढे पीक कापणीचं काम *रोबॉट्स* सहजगत्या करतील. टोमॅटो, स्ट्रॉबेरी अशी फळं नाजूकपणे खुडायची असतात. ती 'पिकली आहेत का' हे ओळखून *रोबॉट्स* ती व्यवस्थित गोळा करून खोक्यामध्ये *पॅक* करून ठेवू शकतील. आतापर्यंत किती फळं खुडली याची अद्ययावत माहिती देत राहतील. शेतकऱ्याचं काम किती सोपं होऊ शकतं याचा अंदाज एव्हाना तुम्हाला आला असेल.

काही शेतकरी जोडधंदा म्हणून पशुपालन करतात. गाई, म्हशी, कोंबड्या किंवा मधमाशा पाळतात. तिथेही *रोबॉट्सची* मदत होऊ शकते. 'गोठ्यांमध्ये हवा पुरेशी खेळती राहते आहे ना' याची ते दक्षता घेतील. गुरांना चारा-पाणी योग्य



वेळी, योग्य प्रमाणात मिळेल याची काळजी *रोबॉट्स* घेतील. त्यांची औषधं, लसी यावर देखील लक्ष ठेवतील.

प्रगत देशांमध्ये कामासाठी मनुष्यबळ कमी पडतं. त्यामुळे तिथे शेतीसाठी *रोबॉट्सचा* सर्रास वापर सुरू झाला आहे. आपल्याकडे तुलनेत कामगार उपलब्ध असतात आणि *रोबॉट्सची* किंमत जास्त वाटू शकते; पण जसा शेतीसाठी *रोबॉट्सचा* वापर वाढत जाईल, तशा त्यांच्या किंमती कमी होतील. तणनाशक टाळणं, पाण्याचा अतिरिक्त वापर कमी करणं, खायला योग्य अशीच फळं खुडणं; या गोष्टींचं महत्त्व लक्षात आलं की, *रोबॉट्समध्ये* पैसे गुंतवण्याचं कारण पटेल. भाज्या किंवा फळं हा नाशवंत माल असतो. *रोबॉट्स* बारीक लक्ष ठेवून नाशवंत माल योग्य वेळी बाजारात जाईल, याची काळजी घेऊ शकतील. तो वाया जाऊ देणार नाहीत. ही नासाडी टाळल्याने शेतकऱ्यांचं उत्पन्न वाढू शकतं.

वाढत्या लोकसंख्येला पुरेल इतकं अन्न उत्पादन घ्यायचं असेल, तर *रोबॉट्सची* उपयुक्तता पुन्हा पुन्हा लक्षात येत राहील. त्यावेळी आपल्याकडेही शेतीतले *रोबॉट्स* रूळू लागतील!

✻✻✻

**– डॉ. मेघश्री दळवी**
meghashri@gmail.com

**जरूर पाहा**
**शेतातले रोबोटस्‌ची चित्रफीत**

## ओळखा पाहू

**खाली दिलेल्या उभ्या, आडव्या, तिरप्या आणि खालून वर, वरून खाली अशा अक्षरांच्या मांडणीतून ५ वाक्प्रचार शोधून काढा पाहू; आणि हो, त्यांचे वाक्यात उपयोग करून पाच वाक्यांचा सुसंगत परिच्छेद देखील लिहा.**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वि | वा | मा | अ | र्षि | र | ल | क | भ्यं |
| क | र | दि | भै | वी | टो | बो | र | ळी |
| चं | छो | ज | द | ल | व | ब | ना | णे |
| बा | णे | व | ण | डा | च | डी | ल | र |
| लं | बा | ग | र | घा | वी | व | व्य | क |
| डा | का | न | ला | ळि | ल | ळ | दी | दो |
| छा | रा | डी | ज्ञ | वा | न | णे | खा | उ |
| पा | ना | द्य | रौ | सं | गा | त्य | व | दो |
| मू | ग | गि | ळ | णे | च | सु | कृ | उ |

**ज्ञान प्रबोधिनीद्वारा खास कुमारांसाठी**
**छात्र प्रबोधन दिनदर्शिका**
**शके १९४५-४६/ इ.स. २०२४**

**निव्वळ दिनर्शिका नव्हे व्यक्तिविकासाचा खजिना!**

**वैशिष्ट्ये :** • राष्ट्रीय सौर दिनांक व ग्रगोरियन दिनांक असलेली संयुक्त दिनदर्शिका
• महत्त्वाचे दिनविशेष– प्रेरणा दिन, सण–उत्सव, राष्ट्रीय दिन
• दर महिन्याच्या मागील पानावर पद्य, वर्गाचे उद्दिष्ट, अभंग, शोध वैज्ञानिक प्रतिभा, कोडे– खेळ–कृती, प्रयोग, विशेषांक, कृतीला चालना.



**मूळ किंमत रु. ३०/–**
**सवलत मूल्य रु. २५/–**
**२५ किंवा त्याहून अधिक प्रतींच्या खरेदीसाठी**
**सवलत मूल्य रु. २०/– प्रत्येकी**

छात्र प्रबोधनच्या मुख्य/स्थानिक कार्यालयात **अथवा**
**jpprakashane.org** या संकेतस्थळावर
दिनांक : १५ डिसेंबर २०२३ पूर्वी नोंदणी करा.
**आपली दिनदर्शिका राखून ठेवा व सवलत मिळवा!!**

**जाणून घ्या : जायकवाडी (महाराष्ट्र)** – हे गोदावरी नदीवरील धरण असून सिंचन व पाणी पुरवठा हा उद्देश आहे.

वार्षिक देणगीदार - ➢ सौ. चारुशीला व श्री. शरद केशव आवटे, पुणे ➢ डॉ. विकास हरताळकर, हरताळकर हॉस्पिटल, चोपडा, जळगाव
➢ सौ. स्मिता चावरे, ऐरोली, नवी मुंबई ➢ सौ. सुनिता जयंत देवगावकर, पुणे ➢ सौ. सुचेता सोनी, पुणे

कथा

# किल्ल्यातील रहस्य (भाग १)

– सुधांशु नाईक

**जवळपास ५ वर्षांनी सचिन मामाच्या गावी सुट्टीला येत होता. गाडीतून येतानाच त्याला गावाच्या मागे उभा असलेला मोठ्ठा किल्ला दिसला. हा किल्ला बघण्याबाबत सचिनची उत्सुकता त्याला शांत बसू देईना. मोठ्यांच्या नकळत सचिन व त्याच्या भावंडांनी किल्ल्यावर जायचा बेत आखला आणि एका नव्या रहस्याची त्यांनी उकल केली. कोणती व कशी ते क्रमश: वाचूया या कथेतून...**



बसच्या खिडकीतून दिसणारा गड बघून सचिनने आईला विचारलं, ''आई मामाच्या गावाचं नाव याच गडावरून ठेवलंय का गं?''

''हो सचिन, हाच तो प्रचंडगड! आणि त्यावरून गावाचे नाव पडलं प्रचंडवाडी,'' आई म्हणाली.

'एवढुसं गाव आणि त्याचं नाव काय तर म्हणे प्रचंडवाडी; पण हा किल्ला मात्र मोठ्ठा दिसतोय.' सचिनला स्वत:शी बोलतानाही हसू आलं.

''आई, गेल्या वेळी तू आम्हाला का गं त्या गडावर जाऊ दिलं नाहीस ?''

''बाळा, तिथं दाट झाडी आहे आणि जायच्या वाटेवरच्या पायऱ्या तुटल्या आहेत. एकीकडे दरी आणि दुसरीकडे डोंगर कडा. जरा पाय घसरला तर थेट जीव जायची भीती. मोठी माणसं पण जायला घाबरतात. तुम्हा लहान मुलांना कसं जाऊ देऊ आम्ही? त्यामुळे यावेळी देखील उगीच गडावर जायचंय असा हट्ट करू नको हं,''

आई असं म्हणाली असली, तरी त्याक्षणी सचिनने मनाशी ठरवलं, यावेळी काहीही करून गडावर जायचंच!

सचिन पहिलीत होता, तेव्हा गावी आला होता. त्यानंतर तो ५ वर्षांनी गावी आला होता. त्याच्या बाबांच्या सारख्या बदल्या होत होत्या, त्यामुळे बाबांना येताच आलं

**जाणून घ्या : भाक्रा (हिमाचल प्रदेश)** – हे सतलज नदीवरील धरण असून सिंचन व पावसाचे पाणी साठवणे हा या धरणाचा उद्देश.


वार्षिक देणगीदार - ➢ श्रीमती पुष्पा गजानन पेंढरकर कराड, सातारा ➢ श्रीमती मृण्मयी कमळापूरकर, पुणे
➢ सौ. गीतांजली अभ्यंकर, पुणे ➢ सौ. उमा गोखले -सोमण, पुणे ➢ कै. सौ. लीला आचवल स्मरणार्थ

नव्हतं. बसमधून ते दोघं उतरले, तर मामा त्यांना समोरच दिसला.

''मामा, मी आलो,'' असं म्हणत सचिन मामाला जाऊन बिलगला.

मामाचं घर म्हणजे एक छोटासा वाडा. समोर भक्कम दिंडी दरवाजा. त्या दरवाज्याच्या दोन बाजूला बसायला लांबलचक ओटे. मुलं रात्री तिथंच बसून गप्पा मारायची. दरवाजा ओलांडून आतमध्ये आलं की, मोकळी जागा. त्याला सगळे 'चौक' असं म्हणायचे. तिथं पाय धुवायला पाण्याचा हौद. तिथून मग मोठी आडवी खोली. त्याला सगळे ओटी असं म्हणायचे. तिथं मोठ्या माणसांना बसायला जागा होती. कुणी पाहुणे, गावातील मातब्बर लोकं आली की, तिथं बसायची.

तिथून आतमध्ये किंचित अंधार असलेले भले मोठे माजघर. बाहेरून आत आलं की, पटकन काही दिसायचं नाही. २ मिनिटं शांत उभं राहिलं की, मग सगळं दिसू लागे. एका कोपऱ्यात आजीची *कॉट* होती. समोर *टीव्ही* ठेवलेलं मोठं टेबल आणि त्याच्या बाजूला



छोटी खोली होती. त्याला सगळे कोठीची खोली म्हणत. तिथं मोठमोठ्या डब्यांतून, पिंपातून धान्य वगैरे भरून ठेवलेलं असे. माजघरातून पलीकडे गेलं की, स्वयंपाकघर आणि तिथंच जेवणाचं टेबल होतं.

सचिन, मामा आणि आईसोबत आत आला.

सचिन आजीला नमस्कार करायला पुढे झाल्यावर आजीने त्याला कुशीत घेतलं. तिच्या सुरकुतल्या हातांचा तो मायेचा स्पर्श, तिच्या नऊवारी लुगड्याचा वास सचिनला जाणवला.

''किती मोठं झालं गं माझं बाळ ते,'' म्हणत आजीने मायेनं पाठीवरून हात फिरवला.

''बसा हं तुम्ही सगळे. मस्त गरम-गरम खायला देते,'' असं म्हणत मामी स्वयंपाकघरात वळली.

मामीने मस्त गरमागरम पोहे केले. मऊ लुसलुशीत पोहे, त्यावर भरपूर ओलं खोबरं आणि परसातील बागेतून काढलेली ताजी कोथिंबीर. ते पाहूनच सचिन खूश झाला. दोन प्लेट पोहे त्यानं कधी संपवले हे



वार्षिक देणगीदार - ➢ श्री. अमित बागाईतकर, पुणे ➢ श्री. नरेंद्र देशमुख, पुणे ➢ डॉ संजय गद्रे, धुळे ➢ श्री. अद्वय जोशी, पुणे ➢ श्री. जयंत कुलकर्णी, पुणे ➢ श्री, कुतूहल लिमये, दिल्ली ➢ श्री. मुकुंद भास्कर कुवर, बोरीवली, मुंबई

त्याचं त्यालाच कळलं नाही.

सचिनला आता त्याच्या मामेभावंडांना भेटायची ओढ लागली होती. कधी एकदा वैशाली आणि अजित शाळेतून घरी येतात असं त्याला झालं होतं. वैशाली चौथीमध्ये होती आणि अजित पाचवीला होता. दोघंही सचिनपेक्षा एक-दोन वर्षांनी लहान. त्यांची छान गट्टी जमायची. आणि त्यांच्यासोबत शेजारी राहणाऱ्या मालूमावशीची लेक अन्वीदेखील असायची. तीही सचिन एवढीच होती. लहानपणी जेव्हा सगळे भेटायचे तेव्हा तर तिची आणि सचिनची सारखी लुटूपुटुची भांडणं व्हायची. सचिनला पूर्वीच्या भेटीतले हे सगळे दिवस आठवत होते. त्या तिघांना कधी एकदा भेटतो असं त्याला झालं होतं!

तो बाहेर जाऊन दिंडी दरवाज्याशेजारील ओट्यावर बसून राहिला. इथून बरोबर समोर तो आकाशात गेलेला डोंगर आणि त्यावरचा तो भला मोठा गड अगदी स्पष्ट दिसत होता. सचिन त्याच्याकडे पाहत तिथं गुपचूप कसं जाता येईल असा विचार करत बसला.

''अरे सचू, तू कधी आलास,'' अशी एकदम आरोळी ऐकू आली आणि सचिन भानावर आला.

''जित्या...,'' असं म्हणून तो उठून अजितजवळ गेला आणि त्याचं लक्ष त्या दोघींच्याकडे गेलं.

''वैशू... किती मोठी झाली ही,'' असं म्हणून त्याने जवळ आलेल्या लहान बहिणीला एक टप्पू दिला.

''आणि ही अन्वी ना... किती वेगळी दिसते आता. एकदम गुब्बू झालीयस हं...,'' असं त्याने म्हणताच तिने उगीच लटक्या रागाने नाक मुरडले. आणि ''ए सच्या, मला गुब्बू काय म्हणतोस रे... तू पण आहेस हं मोटू...,'' असं तिने म्हणताच चौघेही खळखळून हसले.

सगळ्यांनी एकमेकांना पुन्हा घट्ट मिठी मारली. खूप वर्षांनी एकत्र भेटल्यामुळे झालेला आनंद कसा व्यक्त करावा, हेच त्यांना कळत नव्हतं!

तेवढ्यात आतून मामीचा आवाज ऐकू आला, ''ओ बच्चे कंपनी, पाय धुवून आत येणारात की, तिथेच दरवाज्यात दंगा करत बसणार आहात?''

मामीने केलेले कांदेपोहे सगळे फस्त करून चौघंही पुन्हा बाहेर पळाले. त्यांच्या गप्पा सुरू झाल्या.

यावेळी मात्र त्यांच्या गप्पांचा विषय तो समोर दिसणारा गूढ असा 'प्रचंडगड' होता. तिथं जायचं का? याच विषयावर आता त्यांच्या गप्पा रंगल्या होत्या...!

**(क्रमश:)**

✻✻✻

**- सुधांशु नाईक**
द्वारा स्वाती गुणे
३०१/३०२, संकल्प श्रीनिधी अपार्टमेंट,
विशाळगडकर कंपाउंड, बावडा रस्ता,
कोल्हापूर 416003

## सोडवा ही काव्यकोडी

**- एकनाथ आव्हाड**

१) डोक्यावर बसणे
डोळ्यात खुपणे
छाती दडपणे
हात आखडणे

शब्दश: अर्थापेक्षा
वेगळा अर्थ कळे
भाषेचे सौंदर्य
खुले कुणामुळे?

२) कफ आणि खोकल्यावर
फारच गुणकारी
विंचू दंशावरही
उपयोग हिचा भारी

औषधीगुण हिच्या
अंगी ठायी ठायी
संस्कृतमध्ये 'वसाका' नावाने
कोण ओळखले जाई?

(उत्तर : १. वाक्प्रचार २. अडुळसा)

**जाणून घ्या : सेलौलीम (गोवा)** - हे सेलौलीम नदीवरील धरण असून सिंचन व पिण्याच्या पाण्याचा पुरवठा हा या धरणाचा उद्देश.

वार्षिक देणगीदार - ➢ श्री. सचिन गाडगीळ, पुणे ➢ श्री. अमित गद्रे, पुणे ➢ श्री श्रीकृष्ण करंदीकर, पुणे ➢ श्री. अनिल रिसबूड, पुणे ➢ श्री. कुंदन शिंत्रे, डोंबिवली ➢ श्री. कौस्तुभ हळबे, पुणे ➢ श्री. सुभाष गावडे, बोरिवली, मुंबई

# गोंड कला



मध्य भारतातील एक आदिवासी समाज ‘गोंड.’ या जातीतील ‘परधान’ या उपजातीतील कलाकार शेजारी दाखवलेल्या चित्रशैलीत चित्रं काढतात. मध्य प्रदेशातील पूर्व भाग व ओरिसातील पश्चिम भागात यांची वसाहत आहे. जवळपास चाळीस लाख लोकांचा हा समुदाय आहे. यांना सुमारे १४०० वर्षांचा इतिहास आहे. गोंड हा शब्द द्रविड शब्द ‘कोंड’ पासून आला आहे, ज्याचा अर्थ आहे ‘हिरवा पर्वत.’

गोंड देवतांना जागवणं, प्रसन्न करून घेणं, शेतीच्या कामांची सुरुवात करताना, सण साजरे करताना, मंगल प्रसंगी वगैरे परधान जमात पिढ्यान्‌पिढ्यापासून गोंडकथा, कहाण्या, गाणी गात आले आहेत. ही सर्व गाणी-कथा ते आपल्या चित्रांमधून रेखाटतात. शिवाय डोंगर, नाले, जंगल, प्राणी, पक्षी, आदिवासी परंपरा यांची चित्रं ते काढतात.



‘चांगली प्रतिमा पाहिल्याने चांगलेच नशीबी येते’ म्हणून घराघरांवर, भिंतीवर ही कला चितारली जाते. या चित्रांमधून नेहमी समृद्धी व संपन्नता दिसते. गोंडकलेतून खूप कल्पनाविस्तार चित्रित केला जातो. उदाहरणार्थ हरीण, गाय वगैरे शिंगवाल्या प्राण्यांच्या शिंगांना फळाफुलांनी लगडलेल्या, पक्ष्यांनी वस्ती केलेल्या फांद्यांच्या रूपात चित्रित केलं जातं.

चित्रांमध्ये रंगसंगती बरोबरच बारीक-बारीक रेषा, तुटक रेषा, ठिपके यांचा खूप कलात्मक वापर केलेला असतो. या कलेतून रंगांचा एवढा सुंदर वापर केलेला असतो की फिकट रंगाच्या गोष्टी पण जिवंत होतात. उदाहरणार्थ कोळी, मुंगी, पाल वगैरे छोटे फिक्या रंगाचे अकलात्मक समजले जाणारे जीव देखील भडक रंग, रेषा व ठिपक्यांचा मुक्त वापर करून खूपच सुंदर प्रकारे सजीव केले जातात.



प्रामुख्याने कोळसा, रंगीत माती, वनस्पती, चिखल, शेण, फुले-पाने यांपासून रंग बनवले जातात. चित्र काढण्यासाठी आजकाल ब्रश वापरला जात असला तरीही पूर्वी पक्ष्यांची पिसे, बांबूच्या काड्यांचा वापर चित्र काढण्यासाठी होत असे.

**जरूर पाहा**
**गोंड कलेविषयीची चित्रफीत**


**- अपर्णा म्हात्रे**
१/७, विठाबाई निवास, शास्त्रीनगर,
सखाराम कॉम्प्लेक्सजवळ, डोंबिवली (प.), 421202

## निवडक बालकुमार दिवाळी अंक २०२३ – परिचय



**छात्र प्रबोधन** – ज्ञान-मनोरंजन-कृती-विचार-प्रेरणा यांचा संगम असलेला ‘छात्र प्रबोधन’चा हा कुमारांची कृतिशीलता जोपासणारा **बत्तीसावा** दिवाळी अंक! या अंकात आशयघन कथा, कविता, विज्ञान-तंत्रज्ञान, भटकंती, व्यक्तिविकसनपर लेख व प्रेरणादायी अनुभवकथने आहेत. क्षितिज देसाई, सुहासिनी देशपांडे, स्वाती राजे, प्रवीण दवणे, आश्लेषा महाजन, डॉ. प्रदीप आवटे, डॉ. कांचनगंगा गंधे, ऐश्वर्य पाटेकर, भूषण हर्षे इ. मान्यवर लेखकांच्या दर्जेदार साहित्याचा समावेश असून अनेक लेखांना क्यूआर कोडची जोड दिली आहे. मुखपृष्ठकार सचिन जोशी तर दीपक संकपाळ, कुडल हिरेमठ, चित्रांजली, सायली कुलकर्णी इ. चित्रकारांनी चित्रे काढली आहेत. या अंकासोबत सुबोध ग्रामीण दिवाळी व इंग्रजी दिवाळी अंकही प्रकाशित करण्यात आले.

**संपादक : महेन्द्र सेठिया, पृष्ठसंख्या : १२०, किंमत : रु. १२०/– संपर्क : ०२०–२४२०७१७४/१७५**



**वयम्** – मुलांसह मोठ्यांनाही आवडेल असा अंक– ‘वयम्’! राजीव तांबे, श्रीकांत बोजेवार, डॉ. बाळ फोंडके, बेंजामिन फ्रँकलिन, प्रवीण दवणे, गणेश मतकरी, फारूक काझी यांच्या विविधांगी गोष्टी. डॉ. अनिल काकोडकर आणि श्रीराम शिधये, डॉ. उज्वला दळवी, डॉ. शंतनू अभ्यंकर यांचे विज्ञान लेख. मिलिंद जोशी, प्रशांत असनारे, डॉ. संगीता बर्वे, प्रवीण दवणे, एकनाथ आव्हाड, आदित्य दवणे, डॉ. नीलिमा गुंडी यांच्या कविता यांशिवाय नेहमीची सदरे! निलेश जाधव, गिरीश सहस्रबुद्धे, अदिती पाध्ये-देसाई, संतोष घोंगडे, जुईली माहीमकर इ. चित्रकारांची आकर्षक चित्रे, आकर्षक मांडणी, रंगीत छपाई!

**संपादक : शुभदा चौकर, पृष्ठसंख्या : ११६, किंमत : रु. २६०/– संपर्क : ०२२–२५९८६२७३**




**ऋग्वेद** – मासिक ‘ऋग्वेद’चा सव्वीसावा दीपावली अंक हा **‘लोककथा’** विशेषांक म्हणून प्रकाशित करण्यात आला आहे. या दीपावली अंकात राजा शिरगुप्पे, फारूक काझी, सुरेश सावंत, सुरेश वंदिले, पृथ्वीराज तौर, वैशाली सूर्यवंशी आदी मान्यवर लेखकांच्या बालकथांचा समावेश आहे.

**संपादक : सुभाष विभुते पृष्ठसंख्या : ६०, किंमत : रु. १५/– संपर्क : ९४२३२७७०६९**



**किशोर** – किशोरांसाठी **मूलभूत जीवन कौशल्य** या एका संपूर्ण विषयाला केंद्रस्थानी ठेऊन यावर्षीचा बावन्नावा किशोर दिवाळी विशेषांक प्रसिद्ध करण्यात आला आहे. विशेषांकात कथा, कविता, लेख, चित्रकथा, गंमत खेळ यांच्या माध्यमातून या विषयाचे पैलू मांडण्यात आले आहे. लेखक व चित्रकारांनी आपल्या दर्जेदार साहित्यानी व चित्रांनी किशोर दिवाळी अंकाचा दर्जा व सौंदर्य वाढवले आहे. या अंकाचे मुखपृष्ठ ख्यातनाम चित्रकार चंद्रमोहन यांनी चितारले आहे.

**कार्यकारी संपादक : किरण केंद्रे, पृष्ठसंख्या– १३२, किंमत रु. ७५/– संपर्क : ०२०–२५७१६१०७**



**पासवर्ड** – बालकुमार दिवाळी अंकात भन्नाट कथा, अनुभवपर लेख, कुतूहल शमवणारे अन् जागृत करणारे माहितीपर लेख, फोटोंच्या गमती-जमती, कोडी, गंमत चित्रांचा समावेश आहे. मेघश्री दळवी, मृणालिनी वनारसे, श्रीपाद ब्रह्मे इ. मान्यवरांचे साहित्य तर मुखपृष्ठ चित्र दत्तात्रय पाडेकर यांचे आहे.

**संपादक : गौरी कानिटकर, पृष्ठसंख्या– ५०, किंमत रु. ५०/– संपर्क : ०२०–२४४७०८९६**

**पान क्र. २४,२५ वर दिलेल्या ११ दिवाळी अंकांव्यतिरिक्त अन्य कोणते बालकुमार दिवाळी अंक तुमच्या वाचनात आले असतील तर त्यांची माहिती आमच्यापर्यंत जरूर पोहोचवा. पुढील अंकात त्यांचा परिचय करून देऊ!**

**जाणून घ्या धरण : रिहंद (उत्तर प्रदेश)** – हे रिहंद नदीवरील धरण असून सिंचनासाठी पाणी पुरवठा हा या धरणाचा उद्देश.


वार्षिक देणगीदार - ➢ सौ. गौरी उदय जोशी, सातारा ➢ सौ. कस्तुरी व श्री. आदित्य मोडक, मुंबई ➢ श्री. राहुल नांगरे, दिल्ली ➢ श्री. अतुल कुलकर्णी, पुणे - श्रीमती सुशीलाताई कुलकर्णी यांचे स्मरणार्थ ➢ श्री. मयुरेश सोहनी, अहमदाबाद

**कुल्फी** – सर्जनशील, समकालीन आणि बहुसांस्कृतिक साहित्य कुमार आणि किशोर वयोगटातील मुलांना वाचायला मिळावं म्हणून 'कुल्फी' हे नियतकालिक २०२२ साली दिवाळीत सुरू झालं. माधुरी पुरंदरे, वसीम मणेर, उमेश विनायक कुलकर्णी, प्रणव सखदेव, वैशाली सूर्यवंशी आदी उत्तम लेखकांचे लेखन अंकात आहे. चंद्रमोहन कुलकर्णी, ॲलन शॉ, भार्गव कुलकर्णी, शुभांगी चेतन, सानिका देशपांडे, शिवम चौधरी यांसारख्या प्रसिद्ध चित्रकारांनी विविध शैलींत काढलेली लक्षवेधक चित्रं हे या अंकाचं आणखी एक वैशिष्ट्य.



**संपादक : हृषीकेश दाभोळकर, पृष्ठसंख्या : ८४, किंमत : रु. २२०/– संपर्क : ७०६९४२७१५३**

**मुलांचे मासिक** – मागील ९७ वर्षांपासून बालकांचे भावविश्व समृद्ध करणाऱ्या 'मुलांचे मासिक'चा दिवाळी अंक संस्कारांची रुजवणूक करणाऱ्या परंपरेला साजेसा आहे. अभिनेता आणि शास्त्रीय गायक अजय पूरकर व नागपूर आयआयएमचे संचालक डॉ. भीमराया मेत्री यांचे बालपणाचे अनुभव, दर्जेदार कथा, लेख, कविता विभागांतर्गतचे राजीव तांबे, प्रा. सुहास द. बारटक्के, सुरेश वांदिले, एकनाथ आव्हाड, विष्णू मनोहर, श्रेयस भावे, संजीवनी बोकील, मंदा खांडगे, अरुण देशपांडे, रवींद्र चालीकवार इत्यादींचे साहित्य मुलांना संस्कारशील घडविण्यासह त्यांचे भावविश्व समृद्ध करणारे आहे.



**संपादक : जयंत मोडक, पृष्ठसंख्या : ९८, किंमत : रु. १०० /– संपर्क : ०७१२–२७४६१८१**

**मनशक्ती** – लोणावळ्याच्या मनशक्ती प्रयोग केंद्रातर्फे 'मनशक्ती' बालकुमारच्या दहाव्या दिवाळी अंकात १५ कथा, ४ लेख, ५ कविता आणि १ उपक्रम असा भरगच्च वाचनीय मजकूर दिला आहे. 'मनशक्ती' म्हणजे ज्ञान आणि विज्ञानाचा सुंदर संगम! शि. द. फडणीस यांचे आकर्षक मुखपृष्ठ आणि निलेश जाधव यांनी केलेली अंकाची आतील सजावट व बहुरंगी छपाई चित्ताकर्षक आहे.
**संपादक : डॉ. वर्षा तोडमल, पृष्ठसंख्या : ७४, किंमत : रु. १००/– संपर्क : ९०९६९५१२००**




**निर्मळ रानवारा** – 'वंचित विकास' संचालित 'निर्मळ रानवारा'चा ज्ञान आणि मनोरंजन यांनी परिपूर्ण असा हा दिवाळी अंक बालमित्रांना 'पावसाच्या धारां'मध्ये चिंब भिजवणार आहे. मान्यवर लेखकांच्या कथा, कविता, पावसाचे विविध पैलू मुलांपर्यंत पोहोचवणारा हा अंक विनोद, कोडी, शब्दकोडे यांनी सजलेला आहे. हा अंक मुलांनी संग्रही ठेवावा असा आहे.




**संपादक : सुप्रिया कुलकर्णी, पृष्ठसंख्या : १२७, किंमत : रु. ४०/– संपर्क : ७९७१०८६७३०**

**चिकू Piku** – चिकू पिकूचा हा पाचवा दिवाळी अंक अंधार–उजेड विषय घेऊन काढला आहे. अंकात गोष्टी, कविता तसेच कोडी सोडवणे, चित्र रंगवणे इ. कृती दिल्या आहेत. मुखपृष्ठ भक्ती दलाल यांचे आहे. तर रश्मी गुजराथी, विद्याधर शुक्ल, फारुक काझी, रेणू गावस्कर इ. चे साहित्य आहे.



**संपादक : अमृता कावणकर, पृष्ठसंख्या : ७२, किंमत : रु. २००/– संपर्क : ९१७२१३६४७८**

**साधना** – आशयसंपन्न मजकूर, दर्जेदार निर्मिती असलेल्या बालकुमार दिवाळी अंकाला २००८ पासून सुरुवात झाली. या अंकात विषयाच्या मुलभूत संकल्पना स्पष्ट करणारे आणि त्या–त्या विषयांचे समाजजीवनाशी असलेले नाते उलगडून दाखवणारे लेख तज्ज्ञ व्यक्तींनी लिहिले आहेत. गणेश देवी, राजा दीक्षित, विवेक सावंत, सुहास पळशीकर इ. तज्ज्ञ लेखक तर मुखपृष्ठकार गिरीश सहस्रबुद्धे आहेत.



**संपादक : विनोद शिरसाट, पृष्ठसंख्या : ४४, किंमत : रु. ८०/– संपर्क : ७०२८२५७७५७**

तीव्र गारवा हवेत, तेवढ्यात जाणवला । त्यातून हा चंद्ररस, अंगावर पाझरला ।।

वार्षिक देणगीदार - ➤ श्री. किशोर पंडित, चेंबूर, मुंबई ➤ श्री. उदय परांजपे, पुणे ➤ श्री. सुजित उपाध्ये, पुणे ➤ श्री. सतिशचंद्र गोरे, पुणे ➤ श्री. शिवप्रसाद आगटे, पुणे ➤ वाच. अजित कानिटकर, पुणे ➤ श्री. ऋषिकेश कुलकर्णी, पुणे

# छात्र प्रबोधन दिवाळी अंक – २०२३ काही मान्यवरांच्या प्रतिक्रिया

❖ तीनही (नित्य, सुबोध, इंग्रजी) दिवाळी अंक अगदी वेळेत पोहोचवल्याबद्दल प्रथम धन्यवाद! अंकाचे मुखपृष्ठ अर्थपूर्ण, समर्पक आहे. पहिल्या पानावरील 'संवाद' या लेखातून मुलांशी उत्तम संवाद साधत अंकातील खजिना (कथा, ललित, विशेष लेख, कविता) उलगडून दाखवला आहे. ललितमध्ये 'पार्वताईचे अंगण,' 'देणे त्यांना ठाऊक फक्त' हे लेख सुंदर आहेत. 'अन् मला जमू लागले' यातील गणेश हिंगमिरे व पूर्वा बर्वे हिचे मनोगत आत्मबल जागवणे, ध्येयाप्रति आपली वाटचाल कशी असावी व यश मिळवताना येणारे अडथळे कसे पार करावेत, यासाठी फारच उपयुक्त आहेत. यामुळे या अंकाने दिवाळीच्या दीपज्योतींचे उज्ज्वल तेज मनामनात निर्माण केले आहे. **– अंजली पुरंदरे** (चित्रकार)

❖ **'छात्र प्रबोधन'चा दिवाळी अंक म्हणजे विविधतेने नटलेला, कुमारांसाठी अगदी आरोग्यदायी दिवाळी फराळ आहे. कथा, कविता, ललित यांनी हा अंक समृध्द झाला आहे. ऐश्वर्य पाटेकरांसारख्या नामवंत लेखकाचे 'पार्वताईचं अंगण' हा ललित लेख अगदी हळवं करणारा आहे. सुहासिनी देशपांडे यांची 'आमचापण साउंड ऑफ म्युझिक' ही कथा वाचकांना 'खऱ्या' श्रीमंतीची ओळख करून देणारी आहे. 'भंकू आणि त्याचा चॅट जीपीटी' हा लेख हसत खेळत नव्या तंत्रज्ञानाची ओळख करून देतो आणि या तंत्रज्ञानाकडे कसे पहावे, हेही समजावून सांगतो. 'अन् मला जमू लागले' मधील लेखन कुमारांच्या मनात नवी प्रेरणा जागविणारे आहे. एकूण हा दिवाळी अंक वाचकांच्या मनात असंख्य इवले इवले दिवे लावण्यात यशस्वी होतो.**

**– डॉ. प्रदीप आवटे,** (कवी)



नित्य दिवाळी अंक

❖ कोणतंही पुस्तक हाती घेतलं की, आपण पहिलं पान उघडतो. मात्र 'छात्र प्रबोधन'चा अंक हाती पडला की सवयीने शेवटचं पान उघडलं जातं; कारण अंक उघडून त्यातली भेटवस्तू तयार करणे ही माझी शाळेत असल्यापासूनची सवय. अंक वाचायला सुरुवात केली ती शिल्पताईंनी संपादकीयातून साधलेल्या संवादाने. आमचाही 'साउंड ऑफ म्युझिक' ह्या सुंदर कथेनं दिवाळीचा छान मूड तयार केला. प्रवीण दवणे, प्रदीप आवटे आणि इतर दिग्गजांच्या कविता वाचल्या. मुलांच्या भावविश्वातून लिहिलेला कुमार साहित्य संमेलनाचा वृत्तांत वाचला. मी स्वतःही त्या संमेलनात सहभागी झालेलो असल्याने तो अनुभव पुन्हा जिवंत झाला. शिवराज पिंपुडे, ऐश्वर्य पाटेकर, एकनाथ आव्हाड, भूषण हर्षे यांचे लेख भाव आणि भान समृद्ध करणारे आहेत. विशेष उल्लेख म्हणजे मुलांचे पानमध्ये असलेले दोन्ही लेख. कु. जाई आणि कु. प्राची यांना पुढच्या लेखनासाठी अनेक शुभेच्छा!

**– क्षितीज देसाई,** (लेखक)



सुबोध दिवाळी अंक

❖ छात्र प्रबोधनचे तीनही दिवाळी अंक नेहमीप्रमाणे माहितीपूर्ण,उद्बोधक आणि मनोरंजक आहेत. नित्य दिवाळी अंकातील प्रवीण दवणे, आश्लेषा महाजन यांच्या कविता सुंदर, प्रशांत कुलकर्णी यांच्या हसऱ्या रेषा नेहमीप्रमाणेच खुसखुशीत, स्वाती राजे यांची कथा, मोहन शेटे यांची बोधकथा असे एकाहून एक सरस लेख असलेला हा अंक म्हणजे कुमारांसाठी मेजवानीच आहे. 'छात्र प्रबोधन'च्या टीमचे अंकासाठी अभिनंदन आणि पुढील सर्व प्रकल्पांसाठी शुभेच्छा! **– शंतनू पांडे,** (लेखक)




इंग्रजी दिवाळी अंक

❖ यंदाचा सुबोध दिवाळी अंक अतिशय दर्जेदार व आशयघन झाला आहे. ग्रामीण मुलांच्या भावना मांडणाऱ्या कथा, कविता, ललित लेख वाचनीय आहेत. या अंकामध्ये स्थान मिळालं, याचा विशेष आनंद आहे!

**– अशोक कौतिक कोळी** (कवी)

❖ 'छात्र प्रबोधन'तर्फे प्रकाशित झालेले नित्य दिवाळी अंक, सुबोध आणि इंग्रजी दिवाळी अंक दर्जेदार आशय, सुबक मांडणी, वाङ्मयीन गुणवत्ता, आकर्षकता व कृतिशिलता या वैशिष्ट्यांनी परिपूर्ण आहेत.

**– पार्थ जोशी** (लेखक)

**दिवाळी अंक घरपोच मिळण्यासाठी...**

कुरिअरने घरपोच दिवाळी अंक मिळण्यासाठी ज्या सभासदांनी रु. ५०/- जादा भरले आहेत; त्यांना दिवाळी अंक मिळाला नसल्यास त्यांनी ०२०-२४२०७१७४ वर संपर्क करावा. उर्वरित सभासदांनी आपला दिवाळी अंक स्थानिक केंद्रावरून दि. २० डिसेंबर २०२३ पर्यंत घेऊन जावा. स्थानिक केंद्रांचे पत्ते शेजारील क्यू आर कोडमध्ये दिले आहेत. दिवाळी अंक पोस्टाने पाठवला जात नाही.

**सौर अग्रहायण, शके १९४५/डिसेंबर २०२३ पंजीकृत नियतकालिक, ISSN 2279 - 0691 Chhatra Prabodhan**
**प्रकाशन दिनांक : सौर १० अग्रहायण, शके १९४५/१ डिसेंबर २०२३**
**पंजीकरण क्रमांक** (RNI NO.) MAHMAR /2000/5636 **घोषणापत्र क्रमांक :** (SDM/Pune/SR/139/2017)
**टपालाने सवलतीच्या दरात पाठविण्याचा परवाना क्रमांक : PCW/050/2021-2023**
**Date of posting : On 1st day of every month, At the Post office S. P. college, Pune - 30. Date of publication : 1-12-2023**

| सौर दिनदर्शिका शके १९४५ | | |
|---|---|---|
| | सौर अग्रहायण पौष | डिसेंबर २०२३ |
| शु. | अ.१० | 1 |
| श. | ११ | 2 |
| र. | १२ | 3 |
| सो. | १३ | 4 |
| मं. | १४ | 5 |
| बु. | १५ | 6 |
| गु. | १६ | 7 |
| शु. | १७ | 8 |
| श. | १८ | 9 |
| र. | १९ | 10 |
| सो. | २० | 11 |
| मं. | २१ | 12 |
| बु. | २२ | 13 |
| गु. | २३ | 14 |
| शु. | २४ | 15 |
| श. | २५ | 16 |
| र. | २६ | 17 |
| सो. | २७ | 18 |
| मं. | २८ | 19 |
| बु. | २९ | 20 |
| गु. | ३० | 21 |
| शु. | पौ. १ | 22 |
| श. | २ | 23 |
| र. | ३ | 24 |
| सो. | ४ | 25 |
| मं. | ५ | 26 |
| बु. | ६ | 27 |
| गु. | ७ | 28 |
| शु. | ८ | 29 |
| श. | ९ | 30 |
| र. | १० | 31 |



**कुमारांच्या कुंचल्यातून साकारलेले चित्र!** – **चि. आनंद जोशी** (इ. ८ वी), मालवण, जि. सिंधुदुर्ग

**सभासदांनी आपले व्हॉटस्‌अ‍ॅप संपर्क क्रमांक कळवले नसल्यास ९०११११६१४४५ या भ्रमणभाषवर लवकरात लवकर कळवावे. म्हणजे सभासदांशी वेळोवेळी संपर्क साधता येईल. स्पर्धा, उपक्रम, व्याख्याने, नवीन प्रकाशने यांची माहिती पोहोचवता येईल.**

छात्र प्रबोधनद्वारा प्रकाशित **दिनदर्शिकेतील डिसेंबर महिन्याचे पान** पाहाण्यासाठी क्यू आर कोड स्कॅन करा!

**सौर दिनदर्शिकेचा वापर जरूर करा.**

**संपर्क पत्ता :**
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१० सदाशिव पेठ, पुणे 411030
☎ (020) 24207 174/175
www.chhatraprabodhan.org
**इ-मेल :** chhatraprabodhan@jnanaprabodhini.org

**वार्षिक वर्गणी :** ₹ २५०/-
ऑनलाइन वर्गणी भरण्यासाठी व पुस्तक खरेदीसाठी :
**www.jpprakashane.org**

**प्रिय पोस्टमन,**

हा अंक तुम्ही आमच्या लाडक्या मुलामुलींपर्यंत पोहोचवून फार मोठं काम करत आहात. मुलंमुली या मासिकाची फार आतुरतेने वाट पाहात असतात. मासिक वेळेवर मिळाले नाही अथवा मिळालेच नाही तर ती नाराज होतात, त्यांचा तुमच्यावरचा अन् आमच्यावरचाही विश्वास कमी होतो. असं झालेलं तुम्हालाही निश्चितच आवडणार नाही. हो ना!

तेव्हा हे मासिक खात्रीशीरपणे, विनाविलंब शेजारच्या (→) पत्त्यावर द्यावे, ही आग्रहाची, प्रेमळ विनंती.

तुमचा-संपादक, छात्र प्रबोधन